**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)**

१. **पार्श्वभूमी :**

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF) सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.

आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची PhD पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली

| अ क्र | योजना | विद्यार्थी निवड संख्या | कार्यरत विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुख्यमंत्री विशेष संशोधन अधिछात्रवृत्ती (CMSRF) -२०१९ | १४६ | २६ |
| २ | छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०१९ | ३५७ | २०६ |
| ३ | छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२० | २०४ | ११८ |
| ४ | छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२१ | ५५१ | ४५८ |
| ५ | छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२२ | ८५१ | ८२५ |
| ६ | छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)-२०२३ | ९६९ | ९६९ |
| | एकूण | ३०७८ | २६०२ |

आहे.

या विद्यार्थ्यां पैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**२. पात्रता :**

१. लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. (सक्षम प्राधिकरणादवारे केलेले रहिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

२. लाभार्थी महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणी कुणबी-मराठा, या लक्षित गटातील असावा. ( सक्षम प्राधिकरणादवारे केलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

३. लाभार्थी नॉन-क्रिमिलेअर गटातील मोडूनारा असावा. (सक्षम प्राधिकरणादवारे जारी केलेले नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. संदर्भ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सीबीसीबी - १०/२००८/प्र.क्र.६९७/ विभागक-१, दिनांक १६ डिसेंबर २०१७

४. लाभार्थीची पीएच.डी कायम नोंदणी (Confirmation Registration Letter) असणे आवश्यक आहे. (पीएच.डी. चे पंजिकरन नोंदणी पत्र (Confirmation Registration Letter) सादर करणे आवश्यक आहे.)

५. अर्जदाराने पूर्णवेळ (Full time) पीएच.डी. करणे आवश्यक आहे.

६. अर्धवेळेसाठी (Part time) पीएच.डी. ग्राह्य धरणार नाही.

७. अर्थार्जनासाठी इतर संस्थेत नोकरी करीत असल्यास, राजीनामा देऊन कार्यमुक्तीचे पत्र सारथी संस्थेस दिल्यासच अधिछात्रवृत्ती (Fellowship) दिली जाणार नाही.

८. इतर कोणत्याही अधिछात्रवृत्ती/विद्यावेतन/शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही.

९. सदर योजनेत सारथीमार्फत पूर्वी लाभ घेतला असल्यास अर्ज करता येणार नाही.

१०. अर्जदाराचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

११. दूरस्थ शिक्षणामार्फत केली जाणारी पीएच.डी. अधिछात्रवृत्तीकरिता ग्राह्य धरणार नाही.

१२. अधिछात्रवृत्तीकरिता निवड करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी अंतिम निवडीदरम्यान समान गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता त्यांच्या शैक्षणिक पदव्युत्तर गुणांच्या आधारे अधिक गुणवत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात येईल. त्यानंतर जर पदव्युत्तर परीक्षेमध्येही समान गुण असतील तर, पदवी परीक्षेमध्ये गुणांच्या आधारे अधिक गुणवत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात येईल. त्यानंतरही जर, पदवी परीक्षेमध्ये सुद्धा समान गुण असतील तर, त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

**९. लाभार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अधिछात्रवृत्ती :**

| **JRF प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष)** | | **SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष)** | |
|---|---|---|---|
| **विवरण** | **UGC निकषानुसार** | **विवरण** | **UGC निकषानुसार** |
| अधिछात्रवृत्ती रक्कम (प्रती माह प्रती विद्यार्थी) ३७०००X १२ | ४,४४,०००/- | अधिछात्रवृत्ती रक्कम (प्रती माह प्रती विद्यार्थी)४२०००X १२ | ५०,४०००/- |
| *घरभाडे रक्कम (वर्ष भरासाठी) २० % | ८८,८००/- | *घरभाडे रक्कम (वर्ष भरासाठी) २० % | १,००,८००/- |
| **आकस्मित खर्च रक्कम (वर्ष भरासाठी) | २०,५००/- | **आकस्मित खर्च रक्कम (वर्ष भरासाठी) | २५,०००/- |
| **एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती** | **५,५३,३००/-** | **एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती** | **६,२९,८००/-** |
| **एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती** | **४६,१०८/-** | **एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती** | **५२४८३/-** |

उपरोक्त अधिछात्रवृत्ती (CSMNJRF) अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (Award Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ /महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

| अ क्र. | योजनेचे नाव | पात्र विद्यार्थी संख्या | Ph.D पूर्ण संख्या | नोकरी लागलेली संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अधिछात्रवृत्ती-२०१९ | ५०३ | २४६ | ७४ |
| २ | अधिछात्रवृत्ती-२०२० | २०४ | ८० | १८ |
| ३ | अधिछात्रवृत्ती-२०२१ | ५५१ | ६४ | १० |
| ४ | अधिछात्रवृत्ती-२०२२ | ८५१ | ०४ | ०१ |
| ५ | अधिछात्रवृत्ती-२०२३ | ९६९ | ०० | ०० |
| | एकूण | ३,०७८ | ३९४ | १०३ |